# प्रेसनोट दि.२१/०२/२०२०

## रिक्षावर करण्यात आलेल्या परिणामकारक कारवाई

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडील कारवाई

सध्या पिंपरी चिंचवड आयुक्तालयात अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे दिसुन येत आहे. अनेकदा रिक्षाचालक आणि चारचाकी वाहन चालक वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करुन, अवैधरित्या वाहनांत क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवुन वाहन चालवित असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अपघात होऊन लोकांच्या जिवीताचे नुकसान होत असते. अशा अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या रिक्षाचालकांवर तसेच चारचाकी वाहन चालकांवर वचक बसावा याकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडुन दि.०१/०१/२०२० ते दि.२०/०२/२०२० पर्यंत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | शिर्षक | एकुण केसेस | एकुण दंड |
|---|---|---|---|
| १ | रिक्षा कारवाई | ४८७४ | ११६७००० |
| २ | अवैध प्रवासी वाहतुक | १६५ | कोर्ट |

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, पोलीसउप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ यांच्या मार्गदर्शना खालीकरण्यात आली आहे. यापुढे देखील वाहतुकीचे नियमन न पाळणाऱ्या रिक्षाचालकांनी व चारचाकी वाहन चालकांनी अवैधरितींने क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवून वाहन चालविताना निदर्शनास आल्यास त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. जेणेकरुन होणारे अपघात नियंत्रणात आणता येतील व जिवीतहानी टाळता येईल. वाहतुक शाखेकडुन सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येतेकी, त्यांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत.

Neelima 21/02/2020

(निलीमा जाधव)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner